राज्यातील अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना सन २०१५-१६ पासून ५ टक्के वेतनेतर अनुदान सुत्र लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र-२२१४/प्र.क्र.२१८/१४/मशि-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०८ जानेवारी, २०१६.

<u>वाचा :-</u>

१) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.३९/१८(र. व का.), दिनांक १४ ऑगस्ट, २०१३.
२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र.पीएचई/ १३७८/१७९९४/डी-XI, दिनांक ६ एप्रिल, १९८३.
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन आणि युवक सेवा विभाग क्र.एनजीसी-१२७९,१५७७९६ -XXV, दिनांक ३ ऑक्टोबर, १९७९.
४) उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र.स्वाराती-१५९६/अनुदान/ (६५३/९६)/ मशि-३, दिनांक ५ मार्च, १९९७.
५) वित्त विभागाचे अर्ध शासकीय पत्र क्र.अविआ-१००१/प्र.क्र.३९/२००१/वि.आ., दिनांक १०.१२.२००१.
६) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.एनजीसी-२००३/(३५४/०३)/मशि-३, दिनांक २३ सप्टेंबर, २००३ व दिनांक १६ फेब्रुवारी, २००४.
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.न्यायाप्र-२०१०/(प्र.क्र.३७९-A/१०)/ क्रीयुसे-२, दिनांक ११ जुलै, २०१३ व दिनांक ८ ऑगस्ट, २०१३.
८) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक : अमवि/ २०१४/१०७०/ बीपीएड/कोर्टकेस/वेनेतर अनुदान/मवि-२/१०५७८, दिनांक ११.१२.२०१४.

<u>प्रस्तावना :-</u>

शिक्षण व सेवायोजन आणि युवक सेवा विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान सूत्र लागू करण्यात आले आहे. सदर वेतनेतर अनुदान सुत्रामध्ये वेळोवेळी पुनर्विलोकन व सुधारणा करुन संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयान्वये अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना मंजूर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या ५ व्या वेतन आयोगानुसार मागील वर्षीच्या मंजूर वेतनावर ५% एवढी रक्कम महाविद्यालयाकडे प्रत्येक वर्षी जमा होणाऱ्या शुल्कामधून समायोजित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदंर्भाधीन शासन निर्णय क्र.२ येथील शासन निर्णयानुसार राज्यातील अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना मागील वर्षीच्या मंजूर वेतन खर्चाच्या १२% एवढे वेतनेतर अनुदान देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.५ येथील अर्ध शासकीय पत्रान्वये वित्त विभागाने,

राज्यातील अनुदानित महाविद्यालयांना लागू असणाऱ्या वेतनेतर अनुदान सुत्राचे पुनर्विलोकन करुन हे अनुदान टप्प्या-टप्प्याने कमी करुन सन २००४-०५ पर्यंत बंद करण्याबाबत मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय कळविलेला आहे. सदर निर्णयानुसार शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना देण्यात येणारे वेतनेतर अनुदान सन २००७-०८ पासून बंद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र.२२१५/२०१० या न्यायालयीन प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संदर्भ क्र.७ येथील शासन निर्णयांन्वये सन २०१३-१४ पासून राज्यातील अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना देण्यात येणारे वेतनेतर अनुदान पुन्हा सुरु करण्यात आले आहे.

आता संदर्भाधीन क्र.१ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेन्वये शारिरीक शिक्षण महाविद्यालये हा विषय शालेय शिक्षण विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सर्व अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान विधी व अध्यापक महाविद्यालये व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या वेतनेतर अनुदानामध्ये समानता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

या शासन निर्णयाद्वारे शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.न्यायाप्र-२०१०/(प्र.क्र.३७९-A/१०)/क्रीयुसे-२, दिनांक ११ जुलै, २०१३ व दिनांक ८ ऑगस्ट, २०१३ हा अधिक्रमित करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र.पीएचई/१३७८/१७९९४/डी-XI, दिनांक ६ एप्रिल, १९८३ मधील A (iii) (a) ही तरतूद रद्द करण्यात येत आहे. राज्यातील अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांच्या वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत खालीलप्रमाणे सुधारीत तरतूद करण्यात येत आहे:-

(१) सर्व अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालयांप्रमाणेच राज्यातील अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना सन २०१५-१६ पासून या महाविद्यालयांतील मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासनाकडून महाविद्यालयाला जे वेतन अनुदान दिले जाते, त्या वेतन अनुदानाच्या ५ टक्के इतका निधी वेतनेतर अनुदान म्हणून देण्यास पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

“राज्यातील अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांनी प्रत्येक वर्षी जमा झालेल्या शुल्काचे समायोजन करताना, मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाचव्या वेतन आयोगानुसार मान्य असलेल्या वेतन अनुदानाच्या ५ टक्के एवढी रक्कम वेतनेतर खर्चासाठी समाविष्ट करुन समायोजन करावे.”

(२) संचालक, उच्च शिक्षण यांनी सदर अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना देय असणारे वेतनेतर अनुदान संदर्भ क्र.४ येथील दिनांक ५ मार्च, १९९७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या तरतुदींच्या अधीन राहून देण्याची कार्यवाही करावी.

(३) सन २०१५-१६ पासून राज्यातील अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना देय वेतनेतर अनुदानाची रक्कम जमा झालेल्या शुल्कामधून समायोजित करताना वेतन अनुदानात त्रुटी आढळून आल्यास संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे संबंधित विभागीय सह संचालकांमार्फत संपर्क साधावा.

२. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३७९/२०१५/व्यय-५, दिनांक ०८.०६.२०१५ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०८१६३९०५८४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Sakharam Bhalekar

Digitally signed by Rohini Sakharam Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rohini Sakharam Bhalekar
Date: 2016.01.12 15:41:28 +05'30'

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
३) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,
४) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
६) सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
७) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१०) वित्त विभाग (व्यय-५/अर्थ-८), मंत्रालय, मुंबई,
११) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३) प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालये. (संचालकांमार्फत)
१४) कक्ष अधिकारी (मशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) निवडनस्ती-मशि-२.